# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व आदर्श ग्रामराज्य

बांगर नितीनकुमार बाबासाहेब.
सहाय्यक प्राध्यापक व विभाग प्रमुख
राज्यशास्त्र विभाग,
अण्णासाहेब वर्तक महाविद्‌यालय
वसई रोड (प) जि.पालघर-४०१२०२.

**प्रस्तावना:**

राष्ट्र संत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेच्या लेखनातून आदर्शग्राम राज्याची कल्पना मांडली आहे. महाराष्ट्रातील विविध संतांनी चालविलेल्या समाज सुधारणेच्या चळवळींचा विचार करता संत चळवळींचा ग्राम व्यवस्थेशी निकटचा संबंध असल्याचे दिसून येते. अगदी ब्रिटिशपूर्व काळाचा विचार करता जुन्या ग्रामव्यवस्थेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, कारण समाजाचे सारे जीवनच ग्राम व्यवस्थेची निगडित होते. तत्कालीन ग्रामीण गावे ही 'स्थानिक गणराज्याच्या' स्वरूपाची होती. ही गणराज्ये ग्रामाचे संरक्षण, नियंत्रण व नियमन करीत होती. त्याकाळातील समाजातील लोकांच्या गरजा या मर्यादित असल्यामुळे, त्या गावातच पूर्ण केल्या जात असत, परिणामी ग्रामव्यवस्था ही शतकानुशतके चालत आली होती. आर्थिकदृष्ट्या विचार करता गावे ही स्वावलंबी व स्वयंपूर्ण होती.

**प्रमुख शब्द**

आदर्श ग्राम, स्थानिक गणराज्य, ग्रामराज्य, ग्रामसेना, न्यायसेना, ग्रामनिर्माण कला

**संशोधनाची उद्‌दिष्टे**

१) संताच्या शिकवणुकीचे महत्त्व जाणून घेणे.

२) संत मूल्यांची समकालीन उपयुक्तता तपासून पाहणे.

३) ग्रामीण जीवनाचे देशाच्या विकासातील महत्त्व अभ्यासणे.

**गृहितके:**

१) सद्‌यस्थितीत संतांच्या शिकवणुकीची व मूल्यांची आवश्यकता आहे.

२) ग्रामीण भागाच्या विकासावर देशाचा विकास अवलंबून आहे.

प्रत्येक संत पुरुष हे त्या त्या काळाचे अपत्य व प्रवर्तक असतात. संत तुकडोजी महाराजांच्या कार्याचा विचार करतात त्यांचे कार्य मौलिक स्वरूपाचे असून, त्यांचे संतत्व हे इतर संतापेक्षा भिन्न स्वरूपाचे असल्याचे दिसते. ते सातत्याने समाजभिमुख राहिले असून देशालाच देव मानून समाजभिमुख कार्य केल्याचे दिसून येते. महाराजांचे राजकीय विचार त्यांच्या 'ग्रामगीते'तून दिसून येतात. सुस्त समाजाला जागृत करून त्यांच्यात स्फूर्ती निर्माण करण्याचे तत्व त्यामध्ये दिसून येते. महाराजांनी ग्रामगीतेत आदर्श ग्रामराज्याचा विचार मांडला असून एकूणच ग्रामविकासासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींवर प्रामुख्याने प्रकाश टाकला आहे.

**राष्ट्र संत तुकडोजी महाराजांचे राष्ट्र विषयक विचार**

संत तुकडोजी महाराजांना 'राष्ट्रसंत' म्हणून ओळखले जाते. त्यांची राष्ट्रीय भूमिका जाणून घेताना देशाच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील राजकीय परिस्थितीचा विचार करावा लागतो. परकीय राजवटीमुळे भारताचे नुकसान झाले असून होणाऱ्या अत्याचाराला आळा घालण्यासाठी त्यांनी युवाशक्तीला आव्हान केले. लोकही राष्ट्रनिष्ठेने प्रेरित झाले व त्यांनी स्वतःला स्वातंत्र्य चळवळीत झोकून दिले. संघटन ही एक फार मोठी शक्ती आहे हे त्यांनी ओळखले होते. परिणामी संघटनेवर जास्त भर देऊन त्यांनी विविध विधायक कार्यक्रमाद्वारे लोकांमध्ये राष्ट्रधर्माची भावना निर्माण करून राष्ट्रीय जागृती घडून आणली. त्यांनी 'गुरुकुंज आश्रमा'ची स्थापना करून त्यामार्फत व्यायाम, आरोग्य, ग्राम उद्योग, गोरक्षण, कृषी, शाळा, दवाखाना व प्रशिक्षण महाविद्यालय इत्यादी विभाग सुरू करून व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला पोषक अशा कार्यक्रमाची योजना अमलात आणली. महाराजांनी भारतभर परिभ्रमण करून भजन, भाषणाद्वारे व विधायक कार्याद्वारे समाजात राष्ट्र जागृती निर्माण केली. गावोगावी 'श्री गुरुदेव सेवा मंडळा'ची स्थापना करून लोकांना संघटित करून लोकांमध्ये स्वातंत्र्य चळवळीची प्रेरणा निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वराज्याला सुराज्य करण्यासाठी, त्याचबरोबर राष्ट्रीय एकता साधण्यासाठी एकात्मतेचा पुरस्कार करणारी भजने त्यांनी गायली. या भारतात 'बंधुभाव नित्य वसु दे' असे वरदान मागितल्याचे दिसून येते. महाराजांच्या मते राजनीती ही शुद्ध व पवित्र असली पाहिजे. राज्यकर्त्यांनी प्रजेपुढे आपल्या शुद्ध आचरणाचा आदर्श ठेवणे आवश्यक आहे. सामाजिक एकात्मतेला व राष्ट्रीयतेला मारक ठरणाऱ्या गोष्टी दूर करून देशाचे नेतृत्व हे निस्पृह, नि:स्वार्थी, नितीमान व कर्तृत्वान असावे असा विचार मांडला आहे. एकूणच राजकारणात नैतिकतेला अधिक महत्त्व दिल्याचे दिसून येते, की जी सध्याच्या काळाची गरज आहे. सर्वच क्षेत्रात ढासळत चाललेल्या नैतिकतेमुळे समाजात विविध समस्या निर्माण होताना दिसून येतात. देशाला स्वातंत्र्य मिळून ही अनेक समस्या सुटलेल्या नाहीत. लोकशाही शासन पद्धतीत निवडणूका व मतदान यांना अन्ययसाधारण महत्त्व असल्याने त्याबाबत काळजी घेवून लोकांनी फार सावधनतेने

मतदान केले पाहिजे असा विचार मांडला आहे. एकूणच नेतृत्व, मतदान. लोकशाहीशासन इत्यादी कल्पना स्पष्ट केल्या आहेत.

प्रत्येक धार्मिक कार्यातून देखील राष्ट्रसंतांनी वेळोवेळी जाज्वल्य राष्ट्रसंदेश दिल्याचे दिसून येते. देशाने दुसऱ्या देशावर अवलंबून न राहता देशात सैनिक व शस्त्र सज्ज असले पाहिजे. त्यांच्या मते मंदिर हे धर्म व देशरक्षणाचे स्थान आहे. एवढेच नाही तर परचक्रापासून देशाला सुरक्षित ठेवण्याकरिता शाळा आणि विद्यालये हे सामर्थ्यशाली नागरिक निर्माण करण्याचे कारखाने बनले पाहिजेत असा विचार महाराजांनी मांडला आहे.

**युवाशक्ती व राष्ट्र उभारणी**

युवाशक्तीचा उपयोग राष्ट्र उभारणीसाठी व्हावा या उद्देशाने त्यांनी 'आखाडा संघटन समिती' स्थापन केली. गावोगावी व्यायाम शाळा सुरू करण्यात आल्या यामुळे युवकांमध्ये व्यायामाचे महत्त्व पटवून शरीर कमावण्याची व निरोगी जीवन जगण्याची जिद्द निर्माण झाली. देशाचा यथोचित मार्गाने सर्वांगीण विकास करणे ही महान राष्ट्रसेवा आहे असे त्यांचे मत होते.

विविध संतांच्या कार्यामुळेच महाराष्ट्र महान बनला असून महाराष्ट्राने देशाला जागं करण्याचे कार्य केले आहे. संताच्या कार्यामुळेच  येथे औदार्याचं, प्रेमाचं, भक्तीचं एवढेच नाही तर मानवतेचं दर्शन घडत आहे.

तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून 'ग्रामराज्या'ची संकल्पना मांडली असून विशेषतः 'ग्रामकुटुंब' व 'भूवैकुंण्ठ' या दोन अध्यायामध्ये ग्रामराज्याची संकल्पना सविस्तरपणे विशद केलेली आहे. महाराजांच्या कल्पनेतील 'ग्रामराज्य' हे एक आदर्श ग्रामराज्य आहे. यामध्ये एका आदर्श ग्रामराज्याचे चित्र त्यांनी रेखाटले आहे. त्यांच्या मते 'स्वशासन' हे आदर्श ग्रामराज्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ग्राम हे सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनाचे महत्त्वाचे केंद्र असून त्यावरच आपला देश समर्थपणे उभा राहू शकतो याची जाणीव करून दिली आहे. तसेच ग्राम जीवनातील रोजच्या आयुष्यातील सर्व गोष्टीमधून त्यांनी लैकिक, सामाजिक व धार्मिक कार्याचे वैज्ञानिक दृष्टीकोनातून उद्बोधन केले आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे आधुनिक संत मंडळी मधील एक वेगळे संत होते. त्यांच्या अनुपम 'खंजिरी' भजनातून त्यांनी समाज सुधारणा, देशभक्ती, रुढी निर्मूलन, दलितोद्धार, गोरक्षण, समाजसंघटन, ग्राम उद्योग, शेती विकास, शरीर श्रमाचे व व्यायामाचे महत्व, व्यसनमुक्ती, स्त्रीमुक्ती व सर्वांगीण स्वावलंबनात्मक ग्रामोउद्धार याविषयी विचार मांडले आहेत. "समकालीन संत मळींमध्ये तुकडोजी हे थोर राष्ट्रीय पुढारी होते व राष्ट्रीय पुढारी मंडळी मध्ये एक वंदनीय संत होते"[१] तत्कालीन धार्मिक, सामाजिक व राजकीय परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन करून व

त्यासंबंधीचे चिंतन करून समाजामध्ये राजकीय जागृती निर्माण करण्यासाठी त्यांनी विविध उपाय योजलेले दिसतात. एकूणच त्यांच्या कार्यात राष्ट्रीय प्रेरणा व राष्ट्रीय कार्याचे एक वेगळे वैशिष्ट्य दिसून येते. राज्यव्यवस्थेचा एक आदर्श नमुना म्हणून तुकडोजींनी ग्रामगीतेत ग्रामराज्याची कल्पना मांडलेली आहे. ग्रामीण जीवनाच्या सर्वांगीन उद्धाराचा मूलग्राही व तत्वस्पर्शी विचार देणारा हा महत्त्वाचा ग्रंथ आहे.

**नवसमाज निर्मिती**

'जनसेवा हीच ईश्वरसेवा' हे ध्येय समोर ठेवून त्यांनी आपल्या समाजात परस्पर प्रेम, सहानुभूती व सहकार्याचे वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. प्रत्येक व्यक्तीला व गावाला स्वावलंबी बनवून राष्ट्राचे भवितव्य उज्वल बनवून नवीन समाजाची निर्मिती करणे हे त्यांचे स्वप्न होते. सर्व समाज गुण्यागोविंदाने समता, ममता, एकता आणि राष्ट्रीयता या तत्त्वावर उभा राहून तो प्रगत व्हावा यासाठी तुकडोजी महाराजांनी आपल्या वाणी, लेखणी, शक्ती व भक्तीद्वारे निद्रिस्त समाजाला जागृत करण्याचे महान कार्य केले आहे.

“राष्ट्राचे स्वातंत्र्य भवितव्य व उन्नती इतर कोणत्याही गोष्टीवर अवलंबून नसून बालकांना कसे संस्कार केले जातात व कसे शिक्षण दिले जाते यावर अवलंबून आहे. म्हणून मुलांना शिस्तीचे व विरत्वाचे शिक्षण मिळाले पाहिजे. बालके हीच राष्ट्राची खरी संपत्ती असून त्यांना बलवान बुद्धिमान व चारित्र्यसंपन्न नागरिक बनविण्यासाठी प्रयत्न करणे हेच पालक, गुरुजन व समाजाचे आद्य कर्तव्य आहे असे विचार तुकडोजी महाराजांनी मांडलेले दिसून येतात.”[२]

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व भूदान चळवळ**

भारतातील ग्रामीण भागातील खेड्यांच्या समस्या ह्या प्रामुख्याने शेतीच्या प्रश्नावर आधारित असल्यामुळे जमिनीच्या समस्या योग्य पद्धतीने हाताळल्याशिवाय ग्रामीण भागाचा विकास होणार नाही. तसेच ग्रामीण जीवन समृद्ध होणार नाही हे महाराजांनी ओळखले. त्यामुळेच ते भूदान चळवळीत सक्रिय सहभागी झाल्याचे दिसून येते.

**गोरक्षणाचे महत्त्व**

भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे पशुधनाला येथे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. गोरक्षणाचा एक भाग म्हणून गोरक्षण कायदा असावा, गोहत्या थांबवावी म्हणून तत्कालीन सरकारकडे स्वतंत्र भारतात गाईचा वध करण्याला बंदी असावी आणि गोवधबंदीचा कायदा पास करण्यात यावा अशी मागणी केली होती.

**शारीरिक श्रमाला महत्व**

सर्वांनी काम करून गावाचे धन व संपत्तीमध्ये वाढ करावी. कामासाठी गरीब श्रीमंत असा कोणताही भेदभाव न करता सर्वांनी काम करावे अशा प्रकारचा विचार त्यांनी मांडला आहे. प्रत्येकाच्या कार्याचे महत्त्व विशद करताना तुकडोजी महाराजांचे वास्तव्य ज्या झोपडीमध्ये होते त्या झोपडीच्या दरवाजावर लिहिलेला संदेश अंत्यत समर्पक व उद्‌बोधक असल्याचे दिसते. “सत्ता की आयु न बडी- सेवा की ध्वज खडी.” असा संदेश दिलेला आहे.

**ग्रामसुधारणेचा मूलमंत्र**

गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येऊन संघटनात्मकरित्या प्रयत्न करण्यावर त्यांनी जास्त भर दिलेला आहे. सशक्त संघटनेद्‌वारे गावातील अन्यायाचे निर्मूलन करून, न्याय प्रस्थापित करून गावाचे संरक्षण करता येईल असे विचार मांडले आहेत. संघटनेमध्ये शुद्‌ध चरित्राचे लोक असावेत की जे कोणावरही अन्याय होऊ देणार नाहीत. गावातील प्रत्येक समस्या सोडवण्यासाठी गावातील प्रत्येक सज्ञान व्यक्तीने सहकार्य करणे आवश्यक आहे. सर्वांनी एकत्र येऊन संरक्षणात्मक उपाययोजना करून कार्य करणे आवश्यक आहे. कारंजा घाडगे येथील ‘ग्रामीण युवक संमेलना’मध्ये भाषण करताना खेड्‌यातील युवकांचे काही निराळे प्रश्न आहेत व ते सोडविण्यासाठी खास प्रयत्नांची आवश्यकता असून शेतकऱ्यांना शास्त्रीय पद्‌धतीने शेतीचे शिक्षण देण्याची योजना सरकारने स्वीकारली पाहिजे अशा प्रकारचे विचार मांडलेले दिसून येतात

**व्यसन निर्मूलन**

गावातील वाईट प्रवृत्तींना पायबंध घालण्यासाठी गावातील सज्जन मंडळीची एक समिती नेमून अनिष्ट प्रथा बंद करण्याबाबत उपाययोजना केली जावी. त्यासाठी ‘न्यायसेने’ची स्थापना करून, सर्वांमध्ये सहकार्याची भावना वाढीस लावून गावाचा विकास साधला जाऊ शकतो असे मत महाराजांनी व्यक्त केले आहे.

**ग्रामसेना**

गावाच्या सेवेसाठी ग्रामसभेची योजना सुचविली आहे. गावात काही संकटे आल्यास प्रसंगी धावून जाणाऱ्या कर्तव्यदक्ष अशा ‘ग्रामसेने’ची स्थापना करावी की ज्यामार्फत नंदनवन स्थापन केले जाऊ शकेल. अशाप्रकारे ग्रामराज्य सुखी ठेवण्यासाठी विविध संघटनाची स्थापना करून ग्रामरक्षणाला जास्त महत्त्व दिले आहे.

ग्राम शुद्‌धी या अध्यायात ग्राम राज्याच्या हस्तव्यवसायाचे महत्त्व सांगून त्या ठिकाणच्या वस्तुस्थितीचे वास्तव चित्रण मांडलेले आहे. आदर्श ग्राम हा राष्ट्राचा पाया असून हुशार व्यक्तींनी खेड्‌याकडे गेले पाहिजे असे त्यांचे मत होते. गावामध्ये विविध सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक

आहे. सर्वांनी शिस्तबद्धरित्या स्वच्छता पाळल्यास, परस्पराशी प्रेमाने वागल्यास गावाचा स्वर्ग होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

**ग्रामनिर्माण कला**

महाराजांनी ग्रामनिर्माण कलेला सर्वात जास्त महत्त्व दिले असून त्याआधारे सर्वांनी काम करून गाव हे शहरापेक्षाही सुंदर बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे मत मांडले आहे. गावातील बुद्धीवादी लोक कामानिमित्त शहराकडे गेल्यामुळे, तसेच गावी फक्त शेती व्यवसायच शिल्लक राहिला असल्याने गावाची दुर्दशा झाल्याचे दिसते. गावामध्ये कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे छोटे-छोटे उद्योग सुरू केले तर गावाचा कायापालट होऊ शकतो. कारण सर्व कच्चामाल हा गावातच उपलब्ध असतो. मात्र कच्च्या मालावर प्रक्रिया करण्याची सोय नसल्यामुळे हा कच्चा माल कमी किमतीने देऊन पक्का माल जास्त किमतीने खरेदी केल्यामुळे ग्रामीण जनता कशी सुखी होईल असा प्रश्न त्यांनी केला आहे. सर्व सुखाचे मुख्य साधन म्हणून सर्वोत्परी स्वावलंबनाला जास्त महत्त्व दिले आहे. शहरावर विसंबून न राहता सर्वांनी आपले कार्य करावे व गावाचा विकास घडून आणावा यावर त्यांनी जास्त भर दिलेला आहे.

**ग्रामकलेतून देशाचा विकास**

प्रत्येक व्यक्तीकडे काही ना काही कला असते. या कलेद्वारे स्वावलंबन साधने शक्य आहे. यामध्ये प्रामुख्याने बलुतेदारी पद्धतीला अनुसरून ज्या विविध कला आहेत, यावर जास्त भर देण्यात आला आहे. सर्वांनी स्वतःच्या कला जोपासल्यास गावाचा सर्वांगीण विकास घडून येईल. मानवी कलेमुळे गाव शोभून दिसेल. तसेच गावाच्या कलेमुळे प्रांताचा विकास होतो व प्रांताचा विकास झाल्यामुळे देशाच्या ही विकास होतो. अशा प्रकारे ग्राम विकासातून देश विकासाची संकल्पना मांडली आहे.

**स्वावलंबी ग्रामनिर्माण**

गावाच्या ठिकाणी विविध सेवा उपलब्ध असाव्यात. विविध ग्रंथांनी युक्त असे वाचनालय असावे. जगातील घडामोडींची माहिती मिळविण्याच्या दृष्टीने गावात वृत्तपत्रे तसेच आकाशवाणीची ही सोय असावी असा विचार मांडला आहे. त्याचबरोबर गावातील लोकांचे आरोग्य चांगले राहावे याच्यासाठी निसर्ग उपचारासह आरोग्यधाम असावे. प्रत्येकाने आपला वेळ, श्रमशक्ती व बुद्धी गावाच्या विकासासाठी उपयोगात आणल्यास गाव आदर्शपूर्ण होऊन शहराहूनही सुंदर व आकर्षक होईल व गावातील जीवन सुंदर होईल अशा प्रकारचा विचार स्वावलंबी ग्रामनिर्माण या तेराव्या अध्यायात मांडला आहे.

**निष्कर्ष**

सद्यस्थितीतील राजकारणाकडे पाहता यापूर्वी कधी केला गेला नव्हता इतक्या व्यापक प्रमाणावर धर्माचा राजकीय स्वार्थासाठी वापर केला जात आहे. आज पर्यंत भारतीय संस्कृतीने जपलेली उदात मूल्य झपाट्याने घसरणीला लागली आहेत. परिणामी संतकार्याचा आणि त्यांनी उपदेशिलेल्या मुल्यांचा पुन्हः स्वीकार करणे ही सध्याच्या काळाची गरज बनलेली आहे. देशाच्या वर्तमान स्थितीचं चित्र रेखाटताना 'सध्या जाती-पंचायतीच्या नाही तर ग्रामपंचायतीच्या भांडणाने देशात दुहीचे वातावरण पसरले असून घरोघरी 'पंचायती' सुरू झाल्या आहेत' महाराजांचे हे शब्द फार बोलके आहेत. तसेच नफाखोरी, साठेबाजी, सत्ता-मत्ता यांचा दुरुपयोग, अनैतिकता, अशांती, प्रांत भाषा- जाती- पक्ष- पंथ- गटवाद इत्यादी घातक गोष्टींचे उच्चाटन करण्यासाठी आपले आचार विचार व चिंतन असावे असे मत मांडल्याचे दिसून येते. आजही बहुतांशी लोक ग्रामीण भागात राहात असून उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. विविध कारणांनी गावे ओस पडून वाढत्या स्थलांतरामुळे, शहरीकरणामुळे शहरे बकाल बनत चालली आहेत. याचाच परिणाम म्हणून दिवसेंदिवस गावांच्या व शहरांच्या समस्यांमध्ये वाढ होत चालली आहे. परिणामी पन्हः एकदा खेड्यांच्या विकासाकडे लक्ष देणे आवश्यक बनले आहे. त्याशिवाय देशाचा विकास घडून येणे कठीण आहे.

संदर्भ:


१) घोडे राम, समर्थ रामदास- संत तुकडोजी तौलनिक- दर्शन, राजीव प्रकाशन, नागपूर.१९८८.

२) सुंठणकर बा.रं, महाराष्ट्रीय संत मंडळाचे ऐतिहासिक कार्य, पॉप्युलर बुक डेपो, मुंबई.१९९४.

३) गावडे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, श्री गंधर्व वेद प्रकाशन पुणे.२०१०.

४) मुंडे राजेंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी लोकवाड़्मय गृह, मुंबई.१९९८.

५) सावरकर सुदाम, जीवन योगी खंड १०, मित्र समाज प्रकाशन, गोवा.२०१२.

६) https://gramgeetatukdojimaharaj.blogspot.com/2017/06/pdf.html